नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/05/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

## दारूबंदी असलेलयसा चंद्रपुर जिल्हयात जाणारा 78 पेटी देशी दारू माल पकडला
## स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. ची कारवाई

दि. 04/05/2021 रोजी स्थागुशा नागपूर ग्रामीण पथक उमरेड उपविभागात गुन्हेगार शोध व प्रोव्हीशन रेड बाबत पेट्रोलींग करीत असतांना मुखबीराद्वारे खात्रीशिर खबर मिळाली की, पोस्टे भिवापूर अंतर्गत उमेरड–भिसी मार्गावरील ग्रिन पार्क रेस्टोरंट व बार जवळील देशी दारुच्या भटटी मधुन एका सिल्वर रंगाच्या महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाने भिसी जिल्हा चंद्रपूर येथे अवैध्दरित्या विनापरवाना देशी दारुचा पुरवठा होणार आहे. अशा माहिती वरुन खबरेची शहानीशा करणे कामी उमरेड –भिसी मार्गावरील ग्रिनपार्क रेस्टोरंट ॲण्ड बार समोरील शेतामध्ये सापडा रचुन पो.स्टॉफसह बसलो असता काही वेळात मुखबिरने सांगीतल्या प्रमाणे एक सिल्वर रंगाची स्कॉर्पिओ गाडी ग्रिनपार्क रेस्टोरंट ॲण्ड बार जवळील देशी दारुच्या भटटी समोरुन भिसी रोडने येत असतांना दिसुन आल्याने आम्ही पो. स्टॉफच्या मदतीने वाहनास थांबण्याचा इशारा केला असता वाहन चालक आरोपी संदिप सार्थिक मेश्राम, वय 30 वर्ष धंदा ड्रायव्हर रा.वार्ड क्र 6 भिसी ता.चिमुर जि.चंद्रपूर सिल्वर रंगाचे स्कॉर्पीओ वाहन क्र एम.एच–31/बी.बी–1737 वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये 180 एम.एल. देशी दारू ने भरलेल्या कोकण देशी संत्रा दारू च्या 78 पेटी ज्यात एकुण 3,744 काचेची बॉटल कि. 2,62,080/– रू. व सिल्वर रंगाचे स्कॉर्पीओ वाहन क्र एम.एच–31/बी. बी–1737 कि. 7,00,000/– असा एकुण 9,62,080/– रु चा माल जप्त करण्यात आला. सदर आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून आरोपीस पोस्टे भिवापूर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सपोनि जितेंद्र नामदेवराव वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोशि राधेशाम कांबळे, पोशि बालाजी साखरे, चापोहवा भाऊराव खंडाते यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर